# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १३.०६.२०२६

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.१२/०६/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३८९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४,०५,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. १२/०६/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा—या वाहन चालकाविरूध्द कलम २८५ भान्यासं व कलम १८५ मोवाका प्रमाणे एकुण १८ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द अंतर्गत दि. १२/०६/२०२६ रोजी कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर व हट्टा येथे ०२ ठिकाणी भारतीय हत्यार अंतर्गत कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या गौण खनिज वाळुचे उत्खन्नन अंतर्गत दि. १२/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये पोस्टे आखाडा बाळापुर येथे ०१ ठिकाणी यातील आरोपी हे त्याचे आर्थिक फायदयासाठी सदर टिप्पर मध्ये अवैध रित्या गौण खनिज वाळु उत्खनन करून वाहतुक करत चोरून विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करून एकुण ०४,०५,०००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.